आधुनिक भारताचे शिल्पकार नामदार गोपाळ कृष्ण गोखले (१८६६ ते १९१५ ) यांनी पुण्यात १९१० मध्ये स्वत:ची वास्तू बांधली. फर्ग्युसन रस्त्यावर सध्या जे हॉटेल रूपाली आहे, त्याच्या कडून सर्व्हंटस ऑफ इंडीया सोसायटीकडे जो रस्ता जातो , तेथे हे घर पहायला मिळते.
मध्यभागी चौक आणि या चौकात उघडतील अशा दरवाजांची रचना असलेल्या बारा खोल्या, असे या घराचे स्वरूप आहे. सिमेंटचा वापर न करता १५ इंची भिंती बांधताना विटा आणि चुना यांचा वापर करून हे बैठे घर नामदार गोखले यांनी बांधून घेतले. या घराचे डिझाईन गोखले यांनीच तयार केले आणि एका ठेकेदार विश्वासू मित्राकडून त्या वेळी अवघ्या सहा हजार रूपयांत ते बांधले गेले. सार्वजनिक कार्याच्या व्यापामुळे ना. गोखले यांना हे बांधकाम चालू असताना ते पहाण्यासाठी फारसा वेळ मिळत नसायचा. १९१० च्या सप्टेंबर महिन्यात गोखले कुटुंब या वास्तूत रहावयास आले. त्याचे बांधकाम सुमारे अडीच हजार चौरस फूट असून या घरात त्या वेळी त्यांची विधवा भावजय, तिची ६ मुले, दोन विधवा बहिणी आणि त्यांची मुले, असा मोठा प्रपंच रहात होता. तबेला घोड्याची बग्गी, आऊट हाऊस, गोठा आणि नळीची कौले असलेली छपरे ही या वास्तूची आणखी काही वैशिष्ट्ये म्हणता येतील.
या घराची कथाही मोठी रंजक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्यात वारंवार प्लेगची साथ पसरायची . त्यामुळे गावाबाहेरच्या जंगलात तंबू बांधून लोकांचे स्थलांतर केले जायचे. ना. गोखले शनवारात राहायचे. नुकतीच सर्व्हंटस ऑफ इंडीया सोसायटीची स्थापना झाली होती. जमीन करारावर मिळाली होती. पुढे ना. गोखले यांनी प्लेग कॉलनी म्हणून परिचित असलेल्या या जागेतच स्वत:चे घर बांधले. बांधकामाचा उत्कृष्ट नमुना असलेली ही वास्तू आजही त्यांच्या नातवंडानी जशीच्या तशी ठेवली आहे.
येणाऱ्या पाहुण्यांशी चर्चा करण्यासाठी बाहेरची लहानशी खोली, स्वयंपाकघर , विश्रांतीची स्वतंत्र खोली आणि मोठा प्रपंच असल्याने सर्वांना सामावून घेण्यासाठी आणखी काही खोल्या. सर्वांचे दरवाजे अंगणात उघडणारे आणि दिंडी दरवाजातून प्रवेश करताच घराचा संपूर्ण आवाका लक्षात यावा, असे हे दगडी बांधकाम, ही या घराची वैशिष्ट्ये ठरावीत. भारताच्या या आदर्श सेवकाला एक मुलगा आणि दोन मुली होत्या. त्यापैकी काशीबाई ही थोरली मुलगीच तेवढी दीर्घायुषी ठरली. नामदार साहेबांच्या मृत्यूनंतर याच घरात काशीबाईचा आयसीएस न्या. ढवळे यांच्याशी साधेपणाने विवाह झाला. या वेळी काशीबाईंना सख्खे असे कुणीही नव्हते. त्यांच सासरचे नांव आनंदीबाई होते. १९१० ते १९१९ आणि नंतर १९४२ ते १९५७ या कालावधीमध्ये आनंदीबाई या घरात राहिल्या. मधल्या काळात त्या बिहारमध्ये असायच्या. निवृत्त कमिशनर ढवळे हे ना. गोखले यांचे नातू. ते आणि ना. गोखले यांचे पणतू सध्या या घरात रहातात.

या वास्तूमध्ये १९२९ पर्यंत पाण्याची टंचाई होती. लांबवरून पाणी आणावे लागायचे. पुढे ना. गोखले यांच्या इतर नातलगांनी आपापली घरे बांधली आणि ढवळे कुटुंब या वास्तूत राहू लागले. या वास्तूचा सध्याचा क्रमांक ' ९१० शिवाजीनगर ' असा आहे. ना. गोखले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे शिष्य महात्मा गांधी वर्षभर अनवाणी चालत होते. महात्मा गांधी व कस्तुरबा ना. गोखले यांच्या निधनानंतर दहा दिवस रोज या घरात येत असत, अशी माहिती मिळते. श्रीनिवास शास्त्री, पं. हृदयनाथ कुंझरू, सरोजिनी नायडू यांनीही या वास्तूबद्दल आठवणी लिहून ठेवल्या आहेत.

'आपला पुतण्या जर १९२६ सालापर्यंत सर्व्हंटस ऑफ इंडीया सोसायटीमध्ये दाखल झाला तर त्याला ही वास्तू द्यावी, ' असे ना. गोखले यांनी लिहून ठेवले होते. परंतु तसे नघडल्याने त्यांची कन्या आनंदीबाई यांनी संस्थेमध्ये पैसे भरून हे घर विकत घेतले. स्वत:च्या मुलीलाही वडिलांचे घर विकत घ्यावे लागावे, यातून ना. गोखले यांच्या सार्वजनिक स्वच्छ चारित्र्याची प्रतिमा स्पष्ट होते.
प्रपंच्याबद्दलच्या ना. गोखले यांच्या कल्पना अतिशय स्पष्ट होत्या. गरीब कुटुंबात जन्म घेतल्याने त्यांनी खूप पैसे मिळवावेत आणि घरच्यांना सुखी ठेवावे अशी घरच्यांची इच्छा होती ; पण देशसेवेसाठी जीवन समर्पित करण्याचे त्यांनी ठरविल्यावर त्यांच्या बंधूंनीही त्यांच्याशी बोलणे सोडले होते. पुढे त्यांच्या कार्याचे महत्त्व पटल्यावर ते पुन्हा पूर्ववत प्रेम करू लागले, असे ना. गोखले यांनीच लिहून ठेवले आहे. प्रपंचापासून काहीसे अलिप्त राहूनच त्यांनी देशकार्याला वाहून घेतले. त्यासाठी त्यांनी सर्व्हंटस् ऑफ इंडियाच्या आवारातच स्वत:चे व्यक्तिगत निवासस्थान थाटले होते. तेथून या घरात जेंव्हा यायचे, तेंव्हा सर्व नातलगांना बोलावून घ्यायचे आणि विचारपूस करून पुन्हा जायचे. त्यांची नातसून नलीनीताई ढवळे यांनी हे घर अगदी होते तसे ठेवले आहे.
त्यांचे सार्वजनिक कार्य जिथून चालायचे ते सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीमधील त्यांचे बैठे घरही जतन करण्यात आले आहे. सुरवातीला व्हरांडा, बाहेर मिटींगसाठी हॉल, त्याच्या आत चिंतन, लेखन व वाचनाची खोली, स्नानगृह अशी ही वास्तू आहे. तिथे ना. गोखले यांची आरामखुर्ची , पगड्या, वस्त्रप्रावरणे, पत्रव्यवहार, घड्याळ अशा वस्तूंचे संग्रहालय थाटण्याची योजना आहे.

याच वास्तूमध्ये १९ फेब्रुवारी १९१५ या दिवशी नामदार साहेबांचे निधन झाले. या वास्तूच्या बाहेरच्या खोलीत त्यांच्या अंत्यदर्शनासाठी झुंबड उडाली होती. ख्यातनाम लेखक सिडने वेब, बॅ. जीना, महात्मा गांधी, गोपाळराव देवधर, कामगार नेते ना. म. जोशी, ठक्कर बाप्पा, रामकृष्ण भांडारकर आदींचे हे घर प्रेरणा स्थान ठरले. पुढे डॉ. आंबेडकरही या आवारात अभ्यासासाठी येत असत.
ना. गोखले यांचा जन्म पुण्यातला नसला तरी न्यू इंग्लिश स्कूल मधील शिक्षक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीची धुरा वहाणे, 'सुधारक' या इंग्रजी आवृत्तीचे संपादक, काँग्रेस पक्षाचे संयुक्त चिटणीस, 'राष्ट्रभाषा समाचार' चे संपादक, 'सार्वजनिक सभेचे चिटणीस, प्लेग निवारणाचे कार्य, लेजिस्लेटिव्ह कौन्सिल चे सभासद, पुणे नगर पालिकेचे अध्यक्ष, सर्व्हंटस ऑफ इंडियाची स्थापना, अंकगणिताचे पुस्तक, पब्लिक सर्व्हिस कमिशनवर नेमणूक, काँग्रेसच्या तडजोडीचा वाद अशा त्यांच्या सार्याजीवनपटाचा साक्षीदार त्यांच्या पुण्यातील वास्तू आहेत. डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन महाविद्यालय अशा ठीकाणी राहून नामदारसाहेब १८९७ मध्ये शनिवार पेठेतील गोळे वाड्यात रहायला गेले.
रमणबागेच्या चौकातील या वाड्यात ते १३ वर्ष राहिले; म्हणून ही वास्तूही ऐतिहासिक ठरते. गोपाळ शिवराम गोळे यांचा हा तीनमजली वाडा पूर्णतया गोखले यांच्याकडेच होता. प्रारंभी मोठा चौक, तळमजल्यावरील हॉल, माजघर, प्रशस्त स्वयंपाकघर, पडवी, अंगण तिसऱ्या मजल्यावर पोटमाळा आणि मातीचे बांधकाम, असा हा वाडा होता. पुढे गोळे यांच्याकडून साठे यांनी हा वाडा विकत घेतला. तेथे अनेक वर्ष शशी प्रसूतिगृह होते.
१९६२ मधे देशमुखांनी हा वाडा विकत घेतला. १९८८ मधे त्यांनी ओनरशिपची योजना केल्याने ना. गोखले यांच्या त्या वेळच्या सगळ्या खाणाखुणा पूर्णपणे पुसल्या गेल्या. रस्ता रूंदीत बरीचशी जागा गेली. त्यावेळी या घराचा क्रमांक '४४८, शनवार ' होता. आता त्याचा क्रमांक '५७६ शनवार ' असा आहे.

- विकास वाळुंजकर .